**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,
संपादक/वृत्तसंपादक

25/8/15
(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र. २२८४१२५५/२२८१६६५६

---

प्रसिध्दी पत्रक क्र.३१
दिनांक : २५.०८.२०१५

## बेस्टचे वाहन चालन प्रशिक्षण

मुंबई,२५ - उपक्रमाच्या वाहतूक प्रशिक्षण केंद्र, दिंडोशी येथे बाहेरील व्यक्तींसाठी अवजड वाहन चालन सराव योजना प्रशिक्षण शुल्क आकारुन कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा लाभ बाहेरील व्यक्ती घेऊ शकतात याची नोंद घ्यावी. सदर योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत –

- अवघड वाहन चालन सराव प्रशिक्षण घेण्यास उत्सुक असणा-या उमेदवाराकडे अवजड वाहन चालन शिकाऊ परवाना (लर्निंग लायसन्स) अथवा पक्का अवजड वाहन चालन परवाना असणे आवश्यक.
- संपूर्ण प्रशिक्षण कालावधी २१ दिवस परंतु आवश्यकतेनुसार प्रशिक्षण कालावधी कमी किंवा जास्त करण्याची सुविधा, तसेच प्रशिक्षण कालावधीप्रमाणे प्रशिक्षण शुल्क भरण्याची संधी.
- उपक्रमाच्या ज्येष्ठ चालक शिक्षकांद्वारे संपूर्ण मुंबई शहरामध्ये अवजड वाहन चालवण्याचा सराव

----२

- मोटर वाहन कायद्यास अनुसरुन रस्ता वाहतूक व सुरक्षितता नियम, वाहतूक संकेत, रस्त्यावरील खुणा यांची शास्त्रोक्त माहिती
- अपघात विरहित सुरक्षित वाहन चालक पध्दती, इंधन बचत यावर उपक्रमाच्या अधिका-यांची व्याख्याने
- उपक्रमाच्या तज्ञ अभियांत्रिकी अभियंत्याद्वारे वाहनाबाबत कट मॉडेलवर माहिती व व्याख्यान
- योग, तनावमुक्ती, तंबाखुजन्य पदार्थ मुक्तीवर कार्यशाळा
- २१ दिवसाच्या यशस्वी प्रशिक्षणानंतर उपक्रमाचे अवजड वाहन चालन प्रशिक्षण प्रमाणपत्र
- प्रशिक्षण शुल्क २१ दिवसांसाठी रुपये ५२५०/-, प्रति दिन प्रशिक्षण शुल्क रुपये २५०/-
- संपर्क - बेस्ट वाहतूक प्रशिक्षण केंद्र, दिंडोशी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७, संपर्क क्रमांक – २८४०५६४५, संपर्क वेळ – सोमवार ते शनिवार – सकाळी ९.०० ते १७.००.

--------